1135

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, वसमत

इमेल: sdobasmath0@gmail.com फोन: ०२४५४-२२००१६

जा.क्र.२०२१/भुसं/गोळेगाव/कावि-११४ दि.०९.०४.२०२१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी,
हिंगोली.

विषय: भुसंपादनः मौजे गोळगाव
नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम, २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन व क्षेपणभूमी (Dumping Ground) साठी खाजगी जमिनी खाजगी वाटाघाटींद्वारे सरळ खरेदी करणे प्रकरणातील जाहीर नोटीस प्रसिद्ध करणे बाबत.

संदर्भ: १. मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे पत्र जा.क्र.२०२१/भूसंपादन/समन्वय/कावि-१२४५, दि.०८.०३.२०२१.
२. शासन निर्णय क्र.०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दि.१२.०५.२०१५, ३०.०९.२०१५ व क्र.एल.क्यू.एन. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दि.२५.०१.२०१७.
३. मुख्याधिकारी, नगरपंचायत, औंढा (ना) यांचे पत्र जा.क्र.२०२१/स्वच्छता विभाग/कावि-१५३४, दि.३०.०३.२०२१.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी विषयांकीत प्रकरणी या कार्यालयास भुसंपादनाच्या पुढील कार्यवाहीस्तव प्राधिकृत केलेले आहे. प्रकरणी उक्त संदर्भ क्र.२ या शासन निर्णयान्वये खाजगी जमिनी खाजगी रित्या सरळ खरेदीने खरेदी करावयाच्या आहेत. सबब, मुख्याधिकारी, नगरपंचायत, औंढा (ना) यांनी या कार्यालयास प्रमाणित करुन सादर केलेला जाहिर नोटीसचा नमुना यासोबत प्रसिद्धीस्तव आपल्या कार्यालयास पाठविण्यात येत आहे.

करिता कळविण्यात येते की, सदरील जाहिर नोटीस दोन स्थानिक वृत्तपत्रांच्या संपादकांना पाठवून सदरील नोटीस कमीत कमी जागेत प्रसिद्ध करावयाच्या सूचना द्याव्यात.

तसेच यासोबतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या दैनिकांचे प्रत्येकी पाच अंक प्रमाणित केलेल्या देयकांसह या कार्यालयास सादर करावेत.

सोबत: प्रसिद्ध करावयाची जाहीर नोटीस.

स्वाक्षरीत—
(डी.के.गायकवाड)
नायब तहसिलदार
उ.वि.अ.का.वसमत

स्थळ प्रत मा.उ.वि.अ.यांचे स्वाक्षरीस्तव

प्रतिलिपी:

१. मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. तहसिलदार, औंढा (ना) यांना देवून सुचित करण्यात येते की, यासोबतची जाहीर नोटीस संबंधीत गावाच्या गांवचावडीवर डकवून त्याचा प्रसिद्धी पंचनामा या कार्यालयास सादर करावा.
३. व्यवस्थापक, एन.आय.सी.हिंगोली यांना देवून कळविण्यात येते की यासोबतची जाहिर नोटीस जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईवर प्रसिद्ध करावी.
४. मुख्याधिकारी, नगरपंचायत, औंढा (ना) यांना देवून कळविण्यात येते की, यासोबतची जाहीर नोटीस आपल्या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करुन त्याचा प्रसिद्धी पंचनामा या कार्यालयास सादर करावा.

(डी.के.गायकवाड)
नायब तहसिलदार
उ.वि.अ.का.वसमत

झाडे लावा, झाडे जगवा.

नागरी घनकचरा व्यवस्थापण व हाताळणी नियम 2016 ची प्रभावी अंमलबजावणी अंतर्गत घनकचरा व्यवस्थापण क्षेपणभुमी ( Dumping Ground ) साठी खाजगी जमीनी खाजगी वाटाघाटीव्दारे खरेदी करण्यापुर्वी द्यावयाच्या

# जाहिर नोटीसचा नमुना

जा.क्र./2021/भूसं/गोळेगांव/कावि-114
***उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत***
दिनांक :- 09 /04/ 2021

औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे गोळेगांव, येथील तमाम लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, नागरी घनकचरा व्यवस्थापण हाताळणी नियम 2016 ची प्रभावी अंमलबजावणी अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन क्षेपणभूमी ( Dumping Ground ) साठी मौजे गोळेगांव ता. औंढा नागनाथ येथील खाजगी जमीनी खाजगी वाटाघाटीव्दारे सरळ खरेदीने घेण्याबाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी, नगरपंचायत औंढा नागनाथ यांनी सादर केलेला आहे.

सदरील प्रकरणी मा. जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी या कार्यालयास पुढील कार्यवाहीस्तव त्यांचे पत्र क्र. जा.क्र./2021/भूसंपादन/समन्वय/कावि-1245 दिनांक 08.03.2021 अन्वये प्राधिकृत केलेले आहे. सबब, सदरील प्रकरणी महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक 03/2015/प्र.क्र.-34/अ-2 दिनांक 12.05.2015, 30.09.2015 व क्रमांक एल.क्यु.एन.01/2017/ प्र.क्र.-12/अ-2 दिनांक 25.01.2017 मधील तरतुदींनुसार खाजगी जमिनी खाजगी वाटाघाटीव्दारे सरळ खरेदी करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या अर्ध्यक्षतेखाली मोबदला निश्चिती बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

या सोबत अनुसुचित प्रस्तावात नमुद केल्यानुसार शेत गट क्र., जमीन मालकाचे नांव, शेतातील साधने व संपादनासाठीचे प्रस्तावित क्षेत्र नमुद केलेले आहे.

सदर जमीनींच्या मालकी हिश्यावरील हक्क, हितसंबंध, दत्तक पत्र, वारसा हक्क, गहाण, कर्ज, दान, बोजा, बाकी, लिज, बक्षिसपत्र, जप्ती, मदार, व इतर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात ( 7 ) दिवसांचे आंत आपले लेखी आक्षेप पुराव्यासह स्वत: वा प्रतिनिधी मार्फत कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी, वसमत यांचे कार्यालयात सादर करावेत.

## अनुसुची

## मौजे : गोळेगांव ता. औंढा नागनाथ

| अ.क्र. | गट क्र. | एकुण क्षेत्र | खातेदाराचे नांव | साधने | प्रस्तावित क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 79 | 1.60 | कविता देविदास शिंदे | - | 1.60 | गोळेगांव ता. औंढा नागना |
| | | | एकुण | - | 1.60 | |

टिप : 1. उपरोक्त अनुसुचि ही मुख्याधिकारी,नगरपंचातय औंढा नागनाथ यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार आहे.
2. सदरहु जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकानंतर 8 व्या दिवशी ( सुट्टीचा दिवस आल्यास त्यापुढील दिवशी) उपविभागीय अधिकारी, वसमत यांचे कार्यालयात आक्षेपांवर सुनावणी होणार आहे.

**( सचिन जैस्वाल )**
मुख्याधिकारी
नगरपंचायत,औंढा नागनाथ

**(प्रविण फुलारी)**
उपविभागीय अधिकारी, वसमत
वसमत